# काय आहे "लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था ,वडाळा' आणि "बालाजी इंजिनिअरिंग वर्क्स,' व द इंजिनियर्स , चिंचोली एमआयडीसी, सोलापूर. यांच्यातील सामंजस्य करार? हे जाणून घेऊया.




वडाळा: येथील श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, वडाळा संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना संशोधनास चालना मिळावी म्हणून बालाजी इंजिनिअरिंग वर्क्स ,चिंचोली एमआयडीसी ,सोलापूर. आणि द जी इंजिनियर्स ,चिंचोली एमआयडीसी, सोलापूर. या दोन कंपनी आणि लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती लोकमंगल आय.टी.आय.चे प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांनी दिली. या करारांतर्गत लोकमंगल आय.टी.आय.चे विद्यार्थी व निदेशकांना ,शोध प्रकल्प,इंडस्ट्रियल ऑटोमेशन, नवनवीन वेल्डिंग टेक्निक, सीएनसी मशीन, करण्यासाठी इनक्युबेशन डेव्हलप करण्यासाठी मदत होणार आहे. माननीय श्री श्रीकांत मुळे हे बालाजी इंजिनिअरिंग वर्क्स, चिंचोली एमआयडीसी, सोलापूर. या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर असून त्यांची कंपनी विविध क्षेत्रात फॅब्रिकेशन इंजिनिअरिंग मॅन्युफॅक्चरिंग करते जगप्रसिद्ध थरमॅक्स कंपनी ही बालाजी इंजिनिअरिंग वर्क्स ची प्रमुख वेंडर कंपनी आहे. लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना विविध मशीन्स वर ऑन जॉब ट्रेनिंग देण्यासाठी तसेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर अप्रेंटिस ट्रेनिंग साठी, निदेशकांना ट्रेनिंग देण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात आला. श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे TPO/HR माननीय श्री संतोष कुलकर्णी सर, माननीय प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर आणि कॉर्डिनेटर संध्याराणी शिंदे मॅडम यांनी बालाजी इंजिनिअरिंग वर्क्स कंपनीला भेट दिली व कंपनीचे प्रोडक्शन इंजिनियर माननीय श्री प्रसाद गिरी आणि क्वालिटी इंजिनिअर माननीय श्री घनश्याम तगारे यांच्या समावेत सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या.

द जी इंजिनियर्स, चिंचोली एमआयडीसी, सोलापूर ही कंपनी एअर पॉल्युशन कमी करण्यासाठी ज्या उपाययोजना केल्या जातात त्याबाबत काम करते, तसेच ऑटोमोबाईल इंडस्ट्री साठी प्रेस टूल्स बनवणे, विविध प्रकारचे फॅब्रिकेशन पार्ट बनविण्याची काम ही कंपनी करते, कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर माननीय श्री गोरख भोरे सर, कंपनीचे एच आर मॅनेजर श्री प्रेमचंद खंडेलवाल, कंपनीचे प्रोडक्शन इंजिनियर माननीय यजुर्वेदी सर, यांची लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या कॉर्डिनेटर टीम ने भेट घेऊन चर्चा करून सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या